409
12-02-19

आवक क्र./वर्ष २२०
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
07 FEB 2019
कार्यासन क्रमांक
का.अ.
नोंदणी उपमहानिरीक्षक
नोंदणी महानिरीक्षक

Website वर टाकावे

नोंदणी व मुद्रांक विभागातील सह जिल्हा निबंधक व दुय्यम निबंधक कार्यालयांविषयीच्या तक्रारींचे निरसनासाठी जिल्हास्तरीय व्यवस्थेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक, क्र.आस्थाप-२०१९/३९७८/प्र.क्र.०२/म-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०१९

<u>परिपत्रक :-</u>

राज्य शासनाच्या “आपले सरकार पोर्टल” वर नागरीकांनी शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सह जिल्हा निबंधक किवा दुय्यम निबंधक कार्यालयाच्या कामकाजाविषयी काही तक्रारी सूचना किंवा अभिप्राय सादर केल्यास, त्या तक्रारी, सूचना किंवा अभिप्राय संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावे/शिर्षाखाली संकलित होतात. संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्या तक्रारी इ. संबंधित सह जिल्हा निबंधकांकडे कार्यवाहीसाठी वर्ग केल्या जातात व सह जिल्हा निबंधक यांचेकडून त्या तक्रारींचे निराकरण केले जाते.

तथापि सह जिल्हा निबंधक यांनी एखादया तक्रारीवर मुदतीमध्ये कार्यवाही केली नाही किंवा सह जिल्हा निबंधक यांनी केलेली कार्यवाही वा घेतलेला निर्णय संबंधित तक्रारदार, सूचनाकर्ता यांच्या दृष्टीने समाधानकारक नसेल, तर अशा तक्रार व सूचनेवर वरिष्ठ दर्जाच्या त्रयस्थ अधिकाऱ्यांकडून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

आपले सरकार पोर्टल वरून अथवा इतर कोणत्याही माध्यमातून, जिल्हाधिकारी यांच्याकडे सह जिल्हा निबंधक किंवा दुय्यम निबंधक कार्यालयांच्या कामकाजाविषयी तक्रार/सूचना प्राप्त झाल्यास :-

अ) जिल्हाधिकारी यांनी त्याबाबतची स्वतंत्र नोंदवही ठेवावी व त्याबाबत नियमितपणे प्रगतीचा आढावा घ्यावा.

आ) जिल्हाधिकारी यांनी सदर तक्रार/सूचना सह जिल्हा निबंधक यांचेकडे चौकशी व योग्य त्या कार्यवाहीसाठी वर्ग करून, मुदतीत निराकरण करण्याच्या सूचना द्याव्यात तसेच त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल घ्यावा.